## अपील क्र. मुमाआ/नो.क्र.२११६८३/२१/अ.क्र.१०२/२५

श्री. साकीब बेग
रुम नं. ५, कर्णीक चाळ, नित्यानंद नगर, घाटकोपर (प.)
मुंबई – ४०००८६.

**सुनावणी दिनांक : २०.०३.२०२५ (In continuation of order dt.04.03.2025)**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | उपस्थित. |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपीलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

दि.०४.०३.२०२५ रोजी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. त्यांचे म्हणणे ऐकून घेणे आवश्यक असल्यामुळे आज पुर्नसुनावणी घेण्यात येत आहे.

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि.०५.०४.२०२१ रोजीच्या अर्जांन्वये जन माहिती अधिकारींनी शुल्क भरल्यानंतर माहिती देण्यास नकार दिल्यामुळे द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपिलार्थी यांनी त्यांचा अर्ज दि.०१-१०-२०२० अन्वये ईएस-२९९ कामाची दि.०१.०१.२०१६ ते ०१.१०.२०२० पर्यंतची माहितीची मागणी केलेली आहे.

या प्रकरणी आयोगाने दि.०४.०३.२०२५ रोजी सुनावणी घेतली होती. सदर सुनावणीस उपस्थित राहावे, असे दूरध्वनीद्वारे संपर्क करुन संबंधित जन माहिती अधिकारी यांना कळविण्यात आले होते व ट्रॅक रिपोर्ट प्रमाणे जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांना सुनावणी नोटीस प्राप्त आहे. तरीसुध्दा सदर सुनावणीस अपीलार्थी उपस्थित होते. जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित होते. यावरुन असे स्पष्ट होते की, त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीचे उल्लंघन केले. माहिती या प्रकरणातील वस्तुस्थिती व परिस्थिती लक्षात घेता, विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (प.ज.वा.) पू.उ. टी विभाग यांना माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम २० (१) अन्वये अनुक्रमे रु.२५,०००/- (रुपये पंचवीस हजार) एवढी शास्ती करण्यात येत आहे. सदरची शास्ती त्यांच्या मासिक वेतनातून पाच समान हप्त्यात वसूल करण्यात यावी व शासन परिपत्रक सा.प्र.वि. दि.०९-०५-२००७ व शासन सा.प्र.वि. शुध्दिपत्रक दि.२८-०५-२००७ मध्ये नमूद केलेल्या लेखाशीर्षाखाली जमा करावी. शास्तीचा भरणा विहित मुदतीत करून विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (प.ज.वा.) पू.उ. परि-६ यांनी आदेश प्राप्त झाल्यापासून २ महिन्यांच्या आत प्रथम शास्ती वसुलीबाबतचा अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा व त्यानंतर अंतिम वसुलीचा अहवाल आयोगास सादर करावा.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (प.ज.वा.) परि-६ यांना सुनावणी नोटीस प्राप्त असून कोणतीही पूर्व सूचना न देता दुसऱ्यांदा अनुपस्थित आहेत व द्वितीय अपील आदेशाची अंमलबजावणी केलेली नाही. त्यामुळे त्यांच्याविरूध्द सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन परिपत्रक क्र. के. मा अर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ नुसार शिस्तभंग विषयक कार्यवाही का प्रस्तावित करण्यात येऊ नये, याबाबतचा लेखी खुलासा त्यांनी हा आदेश मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत आयोगासमोर सादर करावा. सदर मुदतीत लेखी खुलासा प्राप्त न झाल्यास त्यांचे प्रस्तुत प्रकरणी काहीही म्हणणे नाही, असे गृहित धरुन शिस्तभंगविषयक कार्यवाही प्रस्तावित करण्याबाबतचे आदेश कायम करण्यात येतील याची नोंद घ्यावी असे आदेश दि.०४-०३-२०२५ रोजी पारित करण्यात आले होते.

आजच्या पुर्नसुनावणीस अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (प.ज.वा.) एल विभाग उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (प.ज.वा.) परि-६, अनुपस्थित आहेत.

अपिलकर्तांनी आयोगास सादर केले की, त्यांनी दि.०३-०३-२०२१ च्या पत्रान्वये सहाय्यक अभियंता, एल विभाग (प.ज.वा.) यांना माहिती पुरविण्याचे शुल्क भरले आहे. मला माहिती देण्यात यावी असे कळविले होते. मला माहिती मिळालेली नाही.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (प.ज.वा.) एल विभाग यांनी आयोगास सादर केले की, कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे माहिती देता आली नाही व त्यांना तात्काळ माहिती उपलब्ध करुन देण्याचे मान्य केले.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, अपिलकर्तानी शुल्क भरले आहे. जन माहिती अधिकारींनी आदेश प्राप्तीच्या ३ दिवसात अपिलकर्ताला माहिती उपलब्ध करुन द्यावी. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**१. वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारींनी कार्यवाही करावी.**

**२. अपिल निकाली काढण्यात येत आहे.**

प्रदीप व्यास
२४-३-२०२५

**मुंबई**
**दिनांक : २४.०३.२०२५**

**(डॉ.प्रदीप व्यास)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**